वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-सोमवार दि. ३ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

## उद्या मी पुरावे मांडल्यानंतर फडणवीस, अजित पवार मुंडेंची पाठराखण करूच शकणार नाहीत - अंजली दमानिया



# उद्या धनंजय मुंडेंचा राजीनामा?

मुंबई, (दिव्य न्युज):- बीड सरपंच हत्या प्रकरण आता थेट धनंजय मुंडे यांच्या मंत्रीपदापर्यंत पोहोचल्याचं पाहायला मिळत आहे. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याच्याशी संबंध असल्याच्या मुद्द्यावरून सध्या धनंजय मुंडे चर्चेचा विषय ठरले आहेत. विरोधकांकडून सातत्याने त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. दुसरीकडे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी थेट अजित पवारांची भेट घेऊन त्यांना मुंडेंविरोधात काही पुरावे सादर केले आहेत. मात्र त्यानंतरही कारवाई होत नसल्याचं पाहून आता अंजली दमानियांनी मंगळवारी मोठा गौप्यस्फोट करण्याचा इशारा दिला आहे.



Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com


# दिव्य वार्ता

अंजली दमानियांनी आपल्या अधिकृत एक्स अकाऊंटवर आज सकाळी केलेल्या पोस्टमध्ये उद्या म्हणजेच मंगळवारी सकाळी ११ वाजता पत्रकार परिषद घेऊन मोठा गौप्यस्फोट करणार असल्याचं नमूद केलं आहे. मंगळवारी सकाळी ११ वाजता माझ्या घरून पत्रकार परिषद घेणार आहे. हे भ्रष्टाचाराचे पुरावे पाहून मंत्रिपदाचा राजीनामा मिळेल, अशी अपेक्षा. गेले चार दिवस मी त्याच्यावर काम केलं ▶▶ पान २ वर

## घरात घुसून शेतकऱ्याच्या गळ्याला लावला चाकू
# शेळी, म्हैस विकलेले दीड लाख रुपये लुटले

कडा, (दिव्य न्युज):- चोरट्यांनी घरात प्रवेश करून शेतकऱ्याच्या गळ्याला चाकू लावून दीडलाख रुपयांची रोकड लुटल्याची घटना आष्टी तालुक्यातील शेकडे वस्तीवर रविवारी पहाटे घडली. याप्रकरणी अंमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आष्टी तालुक्यातील महिंदा येथील शेकडे वस्तीवर शेतकरी मोहन शेकडे कुटुंबासह राहतात. शनिवारी रात्री जेवण करून शेकडे कुटुंब घरात झोपले होते. रविवारी पहाटे २ वाजेच्या दरम्यान घराची कडी उघडून चार चोरट्यांनी प्रवेश केला. यावेळी शेकडे यांना जाग आली असता चोरट्यांनी त्यांच्या गळ्याला गळ्याला चाकू लावला. तसेच आरडाओरड करू नये म्हणून तोंड दाबून धरले. इतर चोरट्यांनी घरात शोधाशोध करत पत्र्याची पेटी ताब्यात घेतली. याचवेळी एका चोराने वयोवृद्ध महिलेच्या गळ्यातील सोने तोडले, मात्र, शेकडे कुटुंबीयांनी पान २ वर



## हमीदखान पठाण यांना गंगाई -बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित




पाटोदा, ( दिव्य न्युज):- पाटोदा तालुक्यातील रहिवासी पत्रकारिता क्षेत्रात नेत्रदिपक काम करीत असलेले पत्रकार हमीदखान पठाण यांना शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा मा.आ. भीमराव धोंडे यांच्या आई वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ देण्यात येणारा गंगाई - बाबाजी आदर्श पत्रकारिता पुरस्कार मा.भिमराव धोंडे आणि सिने अभिनेत्री कल्याणी चौधरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला असून हमीदखान पठाण यांनी पत्रकारिताच्या माध्यमातून लोक सहभागातून दुष्काळात शुध्द पिण्यासाठी पाणी वाटप,कोवीड १९ मध्ये किराणा , असंघटित कामगारांसाठी वेळोवेळी ▶▶ पान २ वर

## १०१ गावांच्या पाणीपुरवठा योजनेत अनियमितता
# बीडमध्ये जलजीवनचे ९४ ठेकेदार ब्लॅक लिस्टमध्ये

बीड, (दिव्य न्युज):- जिल्ह्यात सुरु असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत दिलेल्या कालावधीत कामे पूर्ण न करणाऱ्या २२ ठेकेदारांना काळ्या यादीत समाविष्ट करण्याची कारवाई सुरु असतानाच आता आणखी ७२ ठेकेदारांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात येणार आहे. याबाबतची अंतिम कारणे दाखवा नोटीस मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी बजावली आहे.

जलजीवन मिशन अंतर्गत केंद्र शासनाचा कालबद्ध कार्यक्रम तसेच मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवस कार्यक्रमातंर्गत विहित कालावधीत ही कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने ही कारवाई करण्यात आली आहे. यातील अनेक ठेकेदारांकडे पाचपेक्षा जास्त योजनेच्या कामांचे कंत्राट आहे.वडवणी तालुक्यातील कामांचे ठेकेदार एम.टी.फड, मे. तेजस इलेक्ट्रिकल्स ण्ड ▶▶ पान २ वर

## हाच पोलिस बॉडीगार्ड हवा, नेत्यांचा हट्ट का?
# पोलिस सुरक्षा सोडून हारतुरे उचलण्यातच व्यस्त

बीड , (दिव्य न्युज):- संवेदनशील प्रकरणात सर्व खात्री करून काही नेते आणि व्यक्तींना पोलिस संरक्षण म्हणून बॉडीगार्ड दिला जातो; परंतु हा देताना देखील काही नेते हट्ट करत असल्याचे समोर आले आहे. काही बॉडीगार्ड तर वर्षानुवर्षे एकाच नेत्याच्या मागेपुढे फिरताना दिसतात. सुरक्षेऐवजी त्यांचे हारतुरे उचलण्यात व्यस्त असतात. असे प्रकार अनेक सभा आणि कार्यक्रमांच्या ठिकाणी पाहायला मिळत आहेत. अनेकजण तर पोलिसिंग विसरून कार्यकर्तेच झाल्याचा आरोप केला जात आहे.मंत्री, खासदार, आमदारांसह वरिष्ठ अधिकारी यांना मागणीनुसार पोलिस अंगरक्षक दिला जातो. ▶▶ पान २ वर

### आवडीचा न आल्यास परत पाठवतात

एखाद्या नेत्याकडे पोलिस कर्मचारी अंगरक्षक म्हणून नियुक्त केल्यावर काही दिवस सोबत ठेवतात. नंतर मात्र त्यांना कोणतेही कारण न देता परत पाठविले जाते. नेते असल्याने त्यांना कोणी विचारणा करण्याची तसदीही घेत नाहीत. जोपर्यंत आपल्या ओळखीचा येत नाही, तोपर्यंत नेतेही पाठपुरावा करत असल्याचे समजते. सध्या एका नेत्याने असे प्रकार केल्याचे सूत्रांनी सांगितले.

## संतोष देशमुखांच्या भावाने सीआयडीच्या अधिक्षकांची घेतली भेट

### वाल्मिक कराडच्या फॅमिलीबद्दल नवी माहिती समोर

बीड, (दिव्य न्युज):- सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी हालचालींना वेग आला आहे. सीआयडीच्या पथकाच्या हाती काही महत्त्वाचे धागेदोरे लागले आहे. लवकरच वाल्मिक कराड हा शरण येणार असल्याचं सांगितलं जात आहे. तर दुसरीकडे संतोष देशमुख यांचे बंधून धनंजय देशमुख यांनी सीआयडीच्या पथकांची भेट घेतली. यावेळी वाल्मिक कराडच्या दुसऱ्या पत्नीची चौकशी सुरू



असल्याची माहिती ▶▶ पान २ वर

# गावकारभाऱ्यांना चांगलाच दणका

### बीड जिल्ह्यातील २४ सरपंच अन् ८२० सदस्यांचे सदस्यत्व रद्द

बीड , (दिव्य न्युज):- जात वैधता प्रमाणपत्र वेळेत सादर न केल्याने जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी २० जानेवारी रोजी बीड जिल्ह्यात ७ तालुक्यातील १३ सरपंच, तर ४१८ सदस्यांचे सदस्यत्व रद्द केले होते. त्यानंतर आता पुन्हा कारवाई करत ४ तालुक्यांतील ११ सरपंच व ४०२ सदस्यांचे सदस्यत्व ३१ जानेवारी रोजी रद्द केले आहेत. यामुळे ग्रामीण भागातील गावकारभाऱ्यांना चांगलाच दणका बसला आहे.

ग्रामपंचायत निवडणूक लढविणे व त्यातून जिंकणे हे फार मोठे यश असते. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील परिस्थिती वेगळी असते, ग्रामपंचायत निवडणुकीत सहभाग घेऊन निवडून येणे हा प्रतिष्ठेचा विषय मानला जातो. त्यामुळे इतर निवडणुकांपेक्षा ग्रामपंचायत निवडणुकांची रंगत वेगळी असते. ग्रामपंचायत निवडणूक लढविताना अनेकांकडे ▶▶ पान २ वर

### पैसा व मेहनत गेली पाण्यात

आजच्या काळात ग्रामपंचायत निवडणूक लढविणे ही साधी बाब राहिली नाही. ग्रामपंचायत निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारास पाच वर्षांपासून तयारी करावी लागते, त्यासाठी प्रत्येक गावकऱ्याच्या संपर्कात राहावे लागते. सर्वांच्या सुख-दुख:मध्ये सहभागी व्हावे लागते. वेळ प्रसंगी स्वत:च्या खिशातील पैसे खर्च करून ग्रामस्थांची कामे करावी लागतात. निवडणूक लागल्यानंतर पाण्यासारखा पैसा खर्च करावा लागतो. अशा एक ना अनेक बाबींना तोंड देऊन सदस्य निवडून येतात. परंतु, जे ग्रामपंचायत सार्वत्रिक व पोटनिवडणुकीमध्ये राखीव प्रवर्गातून निवडून येतात त्यांना वेळेत आपले कास्ट व्हॅलिडीटी सादर करावी लागते अन्यथा निवडून आलेल्या सदस्यत्व रद्द होत आहे. परिणामी त्यांचा पैसा व मेहनत पाण्यात जाते.




# 'कृष्णा आंधळेला धनंजय मुंडेंनीच लपवलं'

### मनोज जरांगे पाटलांचा मोठा दावा



बीड , (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील मुख्य आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे. बीड पोलिसांनी त्याला फरार घोषित केले आहे. यावरुन आता राजकीय वर्तुळात आरोप - प्रत्यारोप सुरू आहे. दरम्यान, आता मराठा आरक्षणाचे मनोज जरांगे पाटील यांनी यावर प्रतिक्रिया दिली. 'कृष्णा आंधळेला धनंजय मुंडे यांनी लपवले आहे, असा मोठा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला.

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज माध्यमांना प्रतिक्रिया दिल्या. यावेळी त्यांनी मंत्री धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड याच्यावर आरोप केले. जरांगे पाटील म्हणाले, यांनी पाप केली आहेत, आता पाप झाकण्यासाठी बाबांचा वापर करत आहेत. सगळ्यांवर अन्याय झाला आहे. लोकांनी व्यक्त झालं पाहिजे, यात ओबीसी असूदेत किंवा मराठा ▶▶ पान २ वर

# कुस्ती न खेळता महाराष्ट्र केसरी झाले मोहोळ

# शिवराज राक्षे, नियती प्रत्येकांचा बदला घेते



## जे पेरलं तेच उगतं, सिकंदर शेखशी झालेली बेईमानी सर्वांच्याच आठवणीत

नगर, (दिव्य न्युज):- संपूर्ण राज्याचे लक्ष असलेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धा ही मोठ्या राड्यामुळे चर्चेत आली. उपांत्य फेरीत बाद झाल्यानंतर डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे याने पंचांची कॉलर धरली आणि त्यानंतर त्यांना लाथ मारली.पृथ्वीराज मोहोळ विरुद्ध शिवराज राक्षे यांच्यात खेळवला गेला. सामना अतिटतीचा सुरू होता. तेव्हा मोहोळच्या एका डावात राक्षे पाठीवर आला अन् पंचांनी राक्षेला बाद घोषित केलं. पंचांनी पृथ्वीराज मोहोळ याला विजयी घोषित केलं. त्यामुळे राक्षेला राग आला.

या घटनेवर आजी-माजी कुस्तीपटू आणि पंचांकडून प्रतिक्रिया येत आहेत. डबल महाराष्ट्र केसरी पै. चंद्रहार पाटील यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. असा प्रकार कधीच झाला नाही. पण तो का झाला याचा देखील विचार केला पाहिजे. निकाल देण्याची घाई करण्याची गरज नव्हती. राक्षेला आक्षेप नोंदवण्याची संधीच मिळाली नाही. गोष्टी क्लिअर करून निकाल दिला पाहिजे होता. व्हिडिओ पाहून दोन्ही खेळाडूंना गोष्टी समजावून मग निकाल दिला पाहिजे होता, असे चंद्रहार पाटील यांनी सांगितले.कुस्तीतील नियमानुसार दोन्ही खांदे टेकले पाहिजे. व्हिडिओत तरी एकच खांदा टेकला आहे. ही घटना कशामुळे झाले हे कळत नाही. पंचांच्या घाईमुळे असा प्रकार झाला असावा असे चंद्रहार पाटील म्हणाले.या सर्व प्रकारानंतर माध्यमांशी बोलताना शिवराज राक्षे म्हणाला, माझे दोन्ही खांदे टेकले असतील तर मी हार मानायला तयार आहे. तुम्ही टीव्ही रिप्ले बघा. माझ्यावर अन्याय झाला आहे. पंच त्यांना मिळाले आहेत. पुन्हा कुस्ती लढवा.अर्ध्या तासात आक्षेप करता येतो. पण पंचांनी तो नाकारला गेला. पंचांनी चुकीचा निर्णय दिला. त्यामुळे ही घटना घडली, अशी प्रतिक्रिया कुस्तीपटू बाळू बोकडे यांनी दिली.



## शिवराज राक्षेची लाथ ही गरजेचीच....!

गेल्या वर्षी सिकंदर शेख नावाच्या मातीतल्या पैलवनावर अन्याय झाला. त्याने तो अन्याय पचवला. हार पत्कारली, मान्य केली. यात त्याला प्रचंड सहानभुती अन् प्रेम मिळालं.. अन् त्याच जोरावर त्याने पुन्हा एकदा हाबुक ठोकून मैदानात आपलं नाव गाजवलं.परंतु आज पुन्हा एकदा शिवराज राक्षे नावाच्या पैलवणावर अन्याय झालाय. तुम्हाला वाटतं त्यानेही शांत राहावं? त्याने ही हा अन्याय पाचवावा.? त्याने लाथ मारली त्याच समर्थनच नव्हे तर स्वागत केलं पाहिजे.कारण काय तर दिवसा ढवळ्या जेंव्हा कर्तुत्वाचा अवमान केला जातोय याची परतफेड नको व्हायला.

अन् या उलट काही ज्ञान पाजळे पंचाचा झालेला अवमान यावर बोलत आहेत.मुळात कुस्ती म्हणजे महाराष्ट्राच्या लाल मातीतला अस्सल खेळ. आज याच लाल मातीत नामर्दांच्या औलादी जन्म घेऊन स्वतःला केसरीचे मानकरी म्हणून घेत आहेत.

## एक प्रतिक्रिया अशी काही...

पुण्यात महाराष्ट्र केसरी स्पर्धा सुरू होती. कुस्तीचा अंतिम दिवस होता. कुस्ती शौकीन असल्याने पाहुण्यांकडे गेल्याने कुस्ती पाहण्याचा योग आला म्हणून पाहण्यासाठी गेलो होतो.

नशिबाने जिथे बसलो होतो तिथे माझ्या पुढे पुण्यातील कुस्ती क्षेत्रातील दिग्गज बसले होते. सोबत आलेला मित्र सर्वांची ओळख करून देत होता. लोकांचे आप आपसातील चर्चा शिवाय मातब्बर मंडळी यांच्या प्रतिक्रिया ह्या कुस्ती पाहता पाहता अभ्यासत होतो.

सिकंदर व शिवराज राक्षे यांची कुस्ती सुरू झाली तेव्हा जो समालोचन करत होता त्यांच्या बोलण्यातील लहज व घोषणातील एक वेगळेपणा सांगत होता की ह्या कुस्तीला एक वेगळ्या प्रकारे रंग द्यायचा प्रयत्न आहे. एकंदरीत वातावरण तसे होते जे अस्सल कुस्तीप्रेमी होते त्यांच्यात कुठेही हि भावना नव्हती पण प्रेक्षक यामधून काहीजण भाजपा व राजकीय क्षेत्राशी जोडले होते त्यांच्या ठिकाणी वेगळी अशी भावना चर्चेतून दिसून येत होती.

**कुस्ती काही वेळापूर्वी जणू 'धर्मयुद्ध' आहे असं भासवल जात होतं!**

कुस्ती सुरू झाली. कुस्ती पाहताना समोर बसलेल्या पुण्यातील मातब्बर यांनी कुस्ती आपल्या हातातून गेली म्हणून निराशाजनक भावमुद्रेने उठलेले होते त्याक्षणी पंचांनी दिलेला निर्णय, सिकंदर वर अन्याय झालेली भावना, मैदानावर उसळलेल्या संमिश्र प्रतिक्रिया ह्या सर्व सुरू असताना माझ्या समोर बसलेल्या एका कुस्तीचा गंध नसलेल्या भक्ताच्या ग्रूपने एकमेकांना टाळ्या देत अशिल्ल जातीयवादी शेरेबाजी केली.

सिकंदर याने जास्त वाद न घालता खिलाडू वृत्तीने मैदान सोडले. सिकंदर याच्याकडे त्या रेफ्रीची कॉलर पकडून लाथ घालण्याइतपत कदाचित तो ज्या वर्गातून येतो त्यामुळे तशी ताकद नसावी? कदाचित त्यावेळी हि खिलाडूवृत्ती शिवराज याने किंवा त्यांच्या टीमने दाखवली असती तर आज पंचाला लाथ मारायला लागली नसती.

सिकंदरने लाथ मारली असती तर एवढी सहानभूती कदाचित त्याला भेटली नसती. शिवाय आयोजक यांनी आपल्या जिल्ह्यातील मुलगा होतोय म्हंटल्यावर साधलेली चुप्पी बरच काही सांगणारी होती.आता आरोप होतोय की घरातील माणूस महाराष्ट्र केसरी होतोय म्हणून शिवराजवर अन्याय झाला?सिकंदर शेख याच्यावर झालेला अन्याय अमुक धर्म पाहून नजरअंदाज करणाऱ्यांवर आज घराणे शाही मुळे अन्याय झाल्याची भावना आहे.

**आत्ताच्या कुस्तीत शिवराजवर अन्याय झालाय हे १००% मान्य आहे !**

**पण सिकंदरवेळी झालेला अन्याय?**

**अगर ख़िलाफ़ हैं होने दो जान थोड़ी है**
**ये सब धुआँ है कोई आसमान थोड़ी है**
**लगेगी आग तो आएँगे घर कई ज़द में**
**यहाँ पे सिर्फ़ हमारा मकान थोड़ी है**

पान ४ वरून

### वर्षा बंगला पाडून

शिवसेनेचे (ठाकरे) खासदार म्हणाले, मी आयुष्यात पहिल्यांदाच पाहतोय की एक मुख्यमंत्री वर्षा बंगल्यावर जायला घाबरत आहेत. वर्षा बंगल्यावर राहायला जाणं हे प्रत्येकाचं स्वप्न असतं. मात्र फडणवीस तिथे जात नाहीत. फडणवीसांचा पाय वर्षा बंगल्यावर पडत नाही. आमच्या अमृतावहिनींना देखील त्या ठिकाणी जावसं वाटत नाही. असं काय घडलं आहे की वर्षा बंगला पाडून तुम्ही नवीन बंगला बांधायचं ठरवलं आहे. माझ्याकडे खात्रीलायक माहिती आहे, म्हणून मी हा प्रश्न उपस्थित करतोय. संपूर्ण इमारत पाडून खोदकाम करून नव्याने तिथे बंगला उभा करायचा असं काहीतरी चाललंय.

### बाबा मिया इनामदार नगर

महामोर्चा काढतील व नगरपरिषदेचा घेराव केला जाईल याची सर्वस्व जबाबदारी हे नगर प्रशासनाचे असेल असे निवेदन आज आम आदमी पार्टी बीड जिल्ह्याच्या वतीने देण्यात आले हे निवेदन शहर अध्यक्ष सय्यद सादेक शहराध्यक्ष रियाज पठाण ईरशद ईफरोज रफिक पठाण शकीला शेख आयेशा शेख सीमा शेख आसाम शेख इत्यादी महिलांचा मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती

### भारतरत्न लता मंगेशकर

म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा व प्रमुख उपस्थिती मराठवाड्याच्या गुणी गायिका प्रति लता सौ.गीता जायभाये यांची उपस्थिती असणार आहे. भारतरत्न लता मंगेशकर यांच्या गायकीचा मोह सर्व आबालवृद्धांनाच आहे. यावत सूर्य चंद्र तारे असेपर्यंत स्वर्गीय लतादीदींची विविध गाणी अजरामर राहणार असून सदैव ऐकली जाणार आहेत हे नक्की. अंबाजोगाई येथील सर्व गुणी स्थानिक कलावंतांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होत असलेल्या गान कोकिळा स्वरलता या कार्यक्रमासाठी सर्व रसिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, ज्येष्ठ पत्रकार दत्ता आंबेकर , रो.कल्याण काळे,रो. धनराज सोळंकी, प्रशांत लाटकर, पत्रकार आरेफ सिद्दिकी,संपादक परमेश्वर गीते, बळीराम चोपणे, अनंत आरसुडे, कलाकार कट्टा अंबाजोगाई रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी मराठी पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाई वसुंधरा सेवा प्रतिष्ठान अंबाजोगाई च्या सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

पान १ वरून

### उद्या धनंजय

आहे, असं अंजली दमानियांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे.

अंजली दमानियांनी सविस्तर भूमिका मांडली आहे. आता हाती आलेले सगळे पुरावे अतिशय धक्कादायक आहेत. हे पुरावे जेव्हा जनतेसमोर येतील, तेव्हा मोठा निर्णय घ्यायला जनताच त्यांना भाग पाडेल, असं अंजली दमानिया म्हणाल्या आहेत.

मुंडे फडणवीस, अजित पवारांचे मित्र आहेत म्हणून

दरम्यान, धनंजय मुंडे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मित्र असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचा उल्लेख अंजली दमानियांनी केला. सगळ्यांवरच खूप मोठा दबाव आहे. मी हे प्रकरण का लावून धरतेय? कारण जोपर्यंत धनंजय मुंडेंचा राजीनामा होत नाही, तोपर्यंत देशमुख कुटुंबाला न्याय मिळेल असं मला वाटत नाही. इतकं मोठं हत्याकांड महाराष्ट्रात झालंय. त्यात न्याय झाला नाही. का? धनंजय मुंडे देवेंद्र फडणवीस व अजित पवारांचे जवळचे मित्र म्हणून कारवाई होत नसेल, तर या दोघांनाही माझा निरोप आहे की तुम्ही अशा वेळी मैत्री निभवायची नसते, असं अंजली दमानिया म्हणाल्या.

उद्या मी पत्रकार परिषदेत मोठा धडधडीत खुलासा करणार आहे. त्यानंतर मला वाटत नाही की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा अजित पवार हे धनंजय मुंडेंची पाठराखण करू शकतील. ही कागदपत्रं जाहीर झाल्यानंतर मी भगवानगडावर कदाचित स्वत: जाऊन नामदेव शास्त्रींना ते दाखवणार आहे. त्यानंतर भगवानगडानं तरी त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी विनंती मी त्यांना करणार आहे, असा उल्लेख दमानियांनी यावेळी केला.

छगन भुजबळ बहुतेक वाट बघतायत की

छगन भुजबळांनी बीडसंदर्भात केलेल्या उल्लेखावर विचारणा केली असता त्यावर दमानियांनी खोचक प्रतिक्रिया दिली. मला भुजबळांना काहीच म्हणायचं नाहीये. ते बहुतेक वाट बघत असतील की धनंजय मुंडेंचा राजीनामा झाला तर त्यांचं मंत्रिपद आपल्याला मिळेल. हे सगळे एका माळेचे मणी आहेत. त्यामुळे भुजबळ धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची वाट पाहात असतील, असं त्या म्हणाल्या.

### हमीदखान पठाण यांना

आवाज उठवून कामगारांना शासकीय मदत मिळून देणे. सोबत भ्रष्टाचार निर्मूलन समिती , माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ तालुकाध्यक्ष असल्याने वेळोवेळी भ्रष्टाचारा विरुद्ध आवाज उठवून भ्रष्टाचार कमी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. हमीदखान पठाण यांनी गेल्या पंधरा वर्षांपासून पाणी,अन्न, आरोग्य, शैक्षणिक असे विषयांमध्ये केलेल्या कामाची दखल घेऊन त्यांना गंगाई -बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.या पुरस्कारामुळे विविध क्षेत्रातील नामवंतांनी त्यांचे अभिनंदन करत आहेत.

### घरात घुसून शेतकऱ्याच्या

आरडाओरड केला असता सोने तिथेच सोडून घरातील पेटी घेऊन चोरटे पळाले. आवाज ऐकून आलेल्या शेजाऱ्यांनी चोरांचा पाठलाग केला. परंतु, अंधाराचा फायदा घेत चोरटे पसार झाले. पेटी अर्धा किलोमीटर अंतरावर आढळून आणि. त्यातील दीड लाख रूपयांची रोकड चोरट्यांनी लंपास केली आहे. ही रक्कम शेती विक्री आणि शेळी, म्हैस विक्रीतून मिळाली होती.

माहिती मिळताच घटनास्थळी आष्टीचे उपअधीक्षक बाळकृष्ण हानपुडे, अंमळनेर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भार्गव सपकाळ, पोलीस उपनिरीक्षक कृष्णा चव्हाण, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक परशूराम मंजुळे यांनी भेट देऊन पाहणी केली. श्वान पथक,ठसे तज्ज्ञांनी तपास केला. या प्रकरणी मोहन शंकर शेकडे याच्या फिर्यादीवरून रविवारी अंमळनेर पोलीस ठाण्यात चार चोरट्याविरूध्द कलम ३०९(४), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कृष्णा चव्हाण करीत आहेत.

### बीडमध्ये जलजीवनचे

सप्लायर्स, परळीचे एस.पी.कन्ट्रक्शन, धारुरचे तुषार साहेबराव बडे, आर.जी. सानप कन्ट्रक्शन, कृष्णाई कन्ट्रक्शन, संतोष पडुळे, विशाल तांदळे, अनंत तुपे, सुजित डोंगरे, , विजय कन्ट्रक्शन, स्वप्नील चौरे, महेश चंदनशिव, शशिकांत कोटुळे, विजय कन्ट्रक्शन, प्रेमकुमार दराडे, अश्विनी कन्ट्रक्शन,वचिष्ठ घुले, अंबाजोगाई तालुक्यातील कामांचे ठेकेदार योगेश चव्हाण, विजय कन्ट्रक्शन,सुरज गित्ते, सांगळे चंद्रकांत, नीलेश मुंडे, शशिकांत कोटुळे, मे. आरोही सोल्युशन्स, आष्टी तालुक्यातील नामदेव घोडके, मे. साबीर कन्ट्रक्शन, मे. अजिंक्य गवसने, एम.टी. फड, राहुल गर्जे , पोपट आबदार, माजलगाव तालुक्यातील स्वप्नील धुमाळ, भागवत शिंदे, भारत शिंदे, प्रगती कन्ट्रक्शन, अन्सारी तारेक नासीर,

गेवराई तालुक्यातील मे.एन.डी. कन्ट्रक्शन, आबासाहेब जाधव, भागवत शिंदे, राजकुमार घुमरे, महादेव फड, राहुल टेकाळे, धनंजय नामदेव मुंडे, गेवराई मे. प्रगती कन्ट्रक्शन, दादासाहेब खेडकर,जगदंबा कन्ट्रक्शन,शिरुर तालुक्यातील विजय कन्ट्रक्शन, अमोल जायभाये, उदय कन्ट्रक्शन, विवेक पाखरे, मे. आरोही सोलुशन्स, विशाल तांदळे, संग्राम बांगर, मंगेश सानप, बी.व्ही.चव्हाण, पाटोदा तालुक्यातील कामांचे ठेकेदार विजय कन्ट्रक्शन, मे. आरोही सोलुशन्स, संकेत तांदळे, मे. साबीर कन्ट्रक्शन, विजय कन्ट्रक्शन, राणी शिवाजी जाधव, पांडुरंग नेमाने, जगदंबा कन्ट्रक्शन, बीड तालुक्यातील ठेकेदार उदय कन्ट्रक्शन, अक्षय शिंदे, अनिकेत चव्हाण, शशिकांत कोटुळे, एस.पी.कन्ट्रक्शन, शिवाजी चव्हाण , एम.टी. फड या कंत्राटदारांकडे १०१ गावांच्या पाणीपुरवठा योजनेचे काम आहे. या कामांना विलंब केल्याप्रकरणी ७२ ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्यात येणार आहे.

चिचोंटी, लोणवळ,बावी, खडकी,खंडोबाचीवाडी, हिवरा गोवर्धन, आड हिंगणी, देवदहिफळ, खोडास, , हिंगणी, नांदूर घाट, तांबवा, आवसगाव, धर्माळा,नरनळी, कानडी माळी,चंदन सावरगाव, बनकरंजा, उंदरी, चिंचोळी माळी, कोठी, कासारी, गडल्याचीवाडी, बोरी सावरगाव,वाघेबाभुळगाव, सारणी सांगवी, नागझरी, सारुळ, शिरपूर, येल्डा, हिवरा, दत्तपूर, मुळेगाव, अंबलवाडी, अकोला,तडोळा, माकेगाव, बाळेवाडी, देवीनिमगाव, बीडसांगवी, खुंटेफळ पुंडी, अंभोरा, बिरंगळवाडी,जळगाव, दैठणा, कारखेल, राळेसांगवी, पिंपळसुट्टी, गोदावरी तांडा,डुब्बाथडी, गुंजथडी, सिमरी पाल, लवूळ नं.२, शिंदखेड, कुंभेजळगाव, शिंपेगाव, रुई रानमळा, महारटाकळी, जातेगाव, काजळ्याची वाडी, गोपतपिंपळगाव, माळहिवरा, धानोरा, बोरगाव, रामनगर, झापेवाडी, उंबरमुळी, पिंपळनेर, पाडळी, मातोरी, लिंबा, भडखेल, ब्रम्हनाथ येळंब, खोकरमोहा, निरगुडी, सुप्पा,धनगर जवळका, मांडवेवाडी, नागेशवाडी, वाघाचा वाडा, पिंपळवाडी, बेडुकवाडी, भायाळा, भुरेवाडी, महेंद्रवाडी, मंझेरी घाट,रोहतवाडी, आहेर वाडगाव, कर्झनी, परभणी, पालसिंगन, पिंपळवाडी,मौजवाडी, अवलपूर सोनगाव,पारगाव सिरस,हिवरापहाडी, सात्रा-चांदणी व निवडूंगवाडी, सावरगाव घाट, दहिफळ या गावांच्या पाणीपुरवठा योजना दिलेल्या १२ ते १८ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण झाल्या नाहीत.

### पोलिस सुरक्षा सोडून

ऑक्टोबर २०२३ मध्ये बीडमध्ये जाळपोळ झाल्यानंतर जिल्हा विशेष शाखेने काढलेल्या माहितीनुसार अनेकांना पोलिस अंगरक्षक दिले होते. काही दिवस घरांनाही सुरक्षा पुरवली होती; परंतु भीती नसल्याचे समजताच हे संरक्षण काढून घेतले. तोपर्यंत याची काहीही चर्चा झाली नाही; परंतु सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर खंडणीचा गुन्हा दाखल झाला. यात वाल्मीक कराड हा आरोपी झाला आणि त्याला दोन बॉडीगार्ड असल्याचे समजले. त्यामुळे हा मुद्दा चर्चेत आला. विशेष म्हणजे त्याचा बॉडीगार्ड हा उत्तर प्रदेशमध्येही सोबत असल्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. त्यामुळे अंगरक्षक पोलिसांचा मुद्दा ऐरणीवर आला. आता त्याच अनुषंगाने बॉडीगार्ड देताना पोलिस अधीक्षक स्वत: निर्णय घेणार असल्याचे समजते. त्यामुळे वर्षानुवर्षे एकाच नेत्याच्या मागे फिरणाऱ्या पोलिसांच्या पायाखालीच वाळू सरकली आहे. आता त्यांना इतर कामे करावी लागणार आहेत.

सध्या कोणाला अंगरक्षक?

मंत्री धनंजय मुंडे व ड. सुभाष राऊत यांना प्रत्येकी दोन अंगरक्षक आहेत. यासह मंत्री पंकजा मुंडे, खा. बजरंग सोनवणे, आ. प्रकाश सोळंके, आ. संदीप क्षीरसागर, माजी आ. भीमराव धोंडे, जयदत्त क्षीरसागर, अमरसिंह पंडित, मस्साजोगचे धनंजय देशमुख, ॲड. अजय तांदळे यांना प्रत्येकी एक अंगरक्षक आहे. शिवाय जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनाही अंगरक्षक आहेत.

मुख्यालयातील राखीव पोलिस का नाही?

पोलिस मुख्यालयात राखीव पोलिस असतात. त्यांच्यातून एखादा पोलिस कर्मचारी हे अंगरक्षक म्हणून नियुक्त करणे अपेक्षित असते; परंतु पोलिस ठाण्यांसह वाहतूक शाखेतील कर्मचारी हे अंगरक्षक म्हणून नेत्यांकडे आहेत. अगोदरच पोलिस ठाण्यात मनुष्यबळ कमी आणि त्यात नेत्यांकडे अंगरक्षक जात असल्याने अडचण होत आहे.

### संतोष देशमुखांच्या

देशमुख यांनी दिली. तसंच, दोन दिवसांमध्ये या प्रकरणात अटक होईल, असंही त्यांनी सांगितलं.

सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी दुपारी सीआयडी अधिक्षकांची जाऊन भेट घेतली. यावेळी सीआयडीचे अधिकारी गुज्जर यांच्यासोबत त्यांचं बोलणं झालं. बाहेर आल्यानंतर देशमुख यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.गुज्जर साहेबांशी बोलणं झालं आहे. केजला येण्यासाठी सांगितलं आहे, काही चौकशी होणार आहे. सीआयडीच्या टीमकडून वाल्मिक कराडच्या दुसऱ्या पत्नीची चौकशी सुरू आहे. आम्ही इथं स्वत: आलो होतो. आम्ही सगळ्यांवर विश्वास ठेवला आहे. मुख्यमंत्री फडणवीस, तपास यंत्रणा आहे, त्यांच्यावर आमचा विश्वास आहे. जनभावनेचा आदर करून लवकरात लवकर न्याय दिला पाहिजे. अशी आमची पहिल्यापासून मागणी आहे असं देशमुख म्हणाले,

सीआयडीच्या टीमने आम्हाला आश्वासन दिलं आहे, की पुढील एक ते दोन दिवसांमध्ये अटक केली जाईल. सीडीआरबद्दल विचारणा केली आहे, त्याबद्दल मंगळवारी सांगणार आहे' असंही देशमुख यांनी सांगितलं.वाल्मिक कराडला सहआरोपी करावं अशी आमची मागणी आहे. कोर्टात याचिका दाखल केली आहे. पण आमच्याकडे अजून संपूर्ण तपशील नाहीये, जी माहिती हाती येतेय त्यानुसार उद्याकडे सविस्तर माहिती देणार आहोत, असंही देशमुख यांनी सांगितलं.

जी महिला देशमुखांवर आरोप करणार होती, तिचीच रविवारी चौकशी?

दरम्यान, देशमुख हत्या प्रकरणाच्या चौकशीदरम्यान गुन्हे अन्वेषण विभागाचे विशेष पथक विविध अँगलने तपास करीत आहे. रविवारी चार ते पाच महिलांची पोलिसांनी बीडमध्ये चौकशी केली. तसेच धाराशिवच्या कळंब शहरातील महिलेचीही चौकशी करण्यात आली. त्यामुळे जी महिला संतोष देशमुख यांच्यावर छेडछाडीचा आरोप करणार होती, तिचीच पोलिसांकडून चौकशी झाली का? अशी चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे.

### गावकारभाऱ्यांना

जात प्रमाणपत्र नसते. त्यामुळे निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारास निवडून आल्यानंतर आपले जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी एक वर्षाची मुदत असते, परंतु अनेकजणांना आपली वंशावळ व इतर कागदपत्रे सादर करता येत नाही. परिणामी जात पडताळणी वैधता प्रमाणापत्र मिळत नाही. वेळेत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने अनेकांना आपले सरपंच किंवा सदस्यत्व गमावण्याची वेळ येते. आतापर्यंत बीड जिल्ह्यातील सरपंच व सदस्य अशा एकूण ८४४ जणांचे सदस्यत्व रद्द झाले आहे. या संदर्भातील आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहे. ज्यांचे काही आक्षेप असतील त्याच्या सुनावण्या घेऊन निकाली काढण्यात येणार असल्याचे समजते.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठीच्या राखीव असलेल्या जागांवर निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीस जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र निवडून आलेल्या दिनांकापासून ते १२ महिन्यांच्या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे. परंतु, २०२० ते २०२५ या कालावधीत झालेल्या सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर केले नाहीत.

### 'कृष्णा आंधळेला

असो किंवा कोणही असो. ही टोळी विचित्र आहे, टोळी संपणार आहे, असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले. यांची टोळी मोठी आहे, खंडणी मागणारी, छेडछाडी करणारी टोळी वेगळी आहे. खंडण्या मागून गाड्या घ्यायला चांगलं वाटलं. कृष्णा आंधळे कुठेतर लपला असेल सापडेल. कृष्णा आंधळे कुठेही जाणार नाही. त्याला धनंजय मुंडे यांनीच लपवून ठेवले आहे, असा मोठा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला. कृष्णा आंधळेला शोधून काढा नाहीतर गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला.

विधानसभा निवडणुकीच्या आधी धनंजय मुंडे यांच्याकडून मला ७ ते ८ दिवस भेटीसाठी निरोप येत होता. माझ्याकडे गर्दी असल्याने दोन-तीन वेळा ते अर्ध्या वाटेतून माघारीही गेले होते. त्यानंतर एक दिवस ते रात्री दोन वाजता अंतरवालीला आले. त्यावेळी मी सर्व लोकांना भेटून झोपलो होतो. मात्र एक-दोन तास झाले तरी ते काही तिथून गेले नाहीत. त्यामुळे आमच्या लोकांनी मला झोपेतून उठवलं आणि सांगितलं की तुम्हाला भेटल्याशिवाय जाणार नाही, असं धनंजय मुंडेंकडून सांगण्यात आलं आहे. आपण तर सन्मान करणारे लोक आहोत, जातीयवादी लोक नाहीत. त्यामुळे मग मी त्यांना भेटलो. त्यावेळी वाल्मीक कराडही त्यांच्यासोबत होता, अशी माहिती मनोज जरांगे यांनी दिली आहे.